स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

स्थानिक शासन संस्थेतील महिला नेतृत्त्वाचा अभ्यास :
विशेष संदर्भ हिंगोली जिल्हा
(इ.स.१९९९ ते २०२०)

मानव्यविद्या शाखेअंतर्गत राज्यशास्त्र या विषयाच्या विद्यावाचस्पती पदवीसाठी सादर करावयाच्या शोध प्रबंधाचा संशोधन आराखडा.

संशोधक

निरंजन केशवराव पतंगे

मार्गदर्शक

डॉ. पाटील व्ही.आय.

(राज्यशास्त्र विभाग प्रमुख)

(संभाजीराव केंद्रे महाविद्यालय जळकोट,

ता.जळकोट जि. लातुर)

संशोधन केंद्र

पीपल्स कॉलेज, नांदेड

सन - २०२१

“स्थानिक शासन संस्थेतील महिला नेतृत्त्वाचा अभ्यास : विशेष संदर्भ हिंगोली जिल्हा”
(इ.स १९९९ ते २०२०)

संशोधकाची उद्‌घोषणा :-

शासन व्यवस्थेचा एक आदर्श प्रकार म्हणून लोकशाही शासन व्यवस्था मानली जाते. स्वातंत्र्यानंतर भारताने सुद्धा लोकशाही व्यवस्थेचा स्विकार केलेला आहे. या शासन व्यवस्थेत अंतिम सत्ता जनतेच्या हाती असते. म्हणून घटनाकर्त्यांनी धर्म, वंश, जात, भाषा, प्रदेश असा कोणताही भेदभाव न करता सर्वांना मतदानाचा हक्क दिला. लोकशाही शासन व्यवस्थेच्या माध्यमातून स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय ही तत्त्वे रुजविण्यासाठी व सत्तेच्या विकेंद्रीकरणासाठी पंचायत राज व्यवस्थेचा स्वीकार करण्यात आला लोकशाही शासन व्यवस्था यशस्वी होण्यासाठी लोकांचा अधिकाधिक सहभाग असणे आवश्यक आहे. म्हणून घटनाकर्त्यांनी लोकशाही विकेंद्रीकरणाचामार्ग स्विकारला आहे. परंतू जगभराचा विचार केल्यास समाजाचा अर्धा भाग असणारी स्त्री अनेक वर्षे राजकीय क्षेत्रापासून वंचीत राहिलेली आहे.

भारतीय संविधान निर्मात्यांनी मागास असलेल्या समाज घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आरक्षणाचे धोरण स्विकारले आहे. भारतीय घटनेत स्वातंत्र्य, समता, समान संधी ही तत्त्वे स्विकारली असली तरी स्त्रीयांना समान संधी देण्याची मानसिकता होत नव्हती त्याच वेळी आतंरराष्ट्रीय पातळीवर महिलांना त्यांच्या अधिकाराची जाणीव निर्माण करणाऱ्या अनेक चळवळी उभ्या राहिल्या. भारतात स्वातंत्र्यानंतर जरी लोकशाही स्विकारली तरी ही शासन व्यवस्था तळागाळापर्यंत पोहचविण्यासाठी सत्तेचे विकेंद्रीकरण आवश्यक होते. म्हणून भारतात तत्कालीन राज्यकर्त्यांनी पंचायतराज व्यवस्था स्विकारली.

भारतात जवळपास ७०% जनता ग्रामीण भागात राहते. त्यामुळे सर्वसामान्य लोकांचा विकास व्हावा यासाठी पंचायतराज व्यवस्थेचा स्विकार केला. स्वातंत्र्यापूर्व काळातच स्थानिक शासन संस्थेचा पाया घातला गेला. लॉर्ड रिपन यांनी स्थानिक शासन संस्थाना अधिक बळकटी

दिली म्हणून त्यांना स्थानिक शासन संस्थेचा जनक म्हणून ओळखले जाते. पुढे १९१९ च्या व १९३५ च्या कायद्याने स्थानिक शासन संस्थांना चालना मिळाली. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर घटनेने लोकशाही विकेंद्रीकरणाचे तत्त्व स्विकारले व स्थानिक शासन संस्था हा विषय राज्यसूचीत टाकला.पुढे १९५७ ला भारत सरकारने बलंवतराय मेहता समिती स्थापना केली. त्या समितीच्या शिफारशीनुसार १९५९ ला त्रिस्तरीय पंचायतराज व्यवस्था स्विकारण्यात आली. महाराष्ट्र शासनाने सुद्धा अनेक समित्यांची स्थापना करून पंचायतराज व्यवस्था अधिक लोकाभिमुख करण्याचा प्रयत्न केला. परंतू प्रत्यक्षात स्थानिक शासन संस्थाना स्वायत्तता कमी होती. आर्थिक बाबीसाठी त्यांना राज्यशासनाच्या मर्जीवर अवलंबुन राहवे लागे. म्हणून या संस्थाना कार्यक्षम बनविण्यासाठी व घटनात्मक दर्जा बहाल करण्याची भूमिका अनेक विचारवंतानी मांडली या पार्श्वभूमीवर १९८९ ला ६४ वे घटनादुरूस्ती विधेयक मांडले गेले परंतु ते पारीत झाले नाही. पुढे पंचायतराज संस्थाबाबत हेच विधेयक ७३ व्या घटना दुरूस्तीच्या संदर्भाने मांडण्यात आले २२ डिसेंबर १९९२ ला हे विधेयक लोकसभेत मंजूर झाले व २३ डिसेंबर १९९२ ला राज्यसभेत मंजूर झाले. २४ एप्रिल १९९३ पासून हा कायदा संपूर्ण भारतभर लागू झाला.

सत्तेचे विकेंद्रीकरण करण्यासाठी ह्या संस्थामध्ये अधिकाधिक लोकांचा सहभाग वाढविण्यासाठी स्त्रीयांचा सहभाग असणे आवश्यक आहे. म्हणून ७३ व्या घटनादुरूस्तीद्वारे राज्यघटनेच्या कलम २४३(ब) मध्ये प्रत्येक स्थानिक शासन संस्थेत थेट निवडणूकीद्वारे भरावयाच्या जगाच्या एक तृतीयांश पेक्षा कमी नसतील एवढ्या जागा महिलांसाठी राखून ठेवल्या ३३% जागा महिलांना राखीव झाल्यामुळे स्थानिक शासन संस्थेत महिलांचा सहभाग वाढला व ७३ व्या ७४ व्या घटना दुरूस्तीने स्थानिक शासन संस्थांना घटनात्मक दर्जा सुद्धा प्राप्त झाला. महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्याने महिलांचे प्रतिनिधीत्व वाढावे यासाठी ५०% आरक्षित जागाची तरतूद केली. महिलांना स्थानिक शासन संस्थेत आरक्षण हे महिला सबलीकरणासाठी महत्त्वाचे पाऊल ठरले. या पार्श्वभूमीवर स्थानिक शासन संस्थेत महिलांचा सहभाग व नेतृत्त्वाला महत्त्व प्राप्त झाले.

आज ७३ व्या व ७४ व्या घटनादुरूस्तीला जवळपास २५ वर्षे उलटून गेलेत या काळात महिला आरक्षणाचा कितपत फायदा महिलांना झाला हे पाहणे महत्त्वाचे ठरते. एखाद्या धोरणाच्या फलनिष्पत्तीच्या मुल्यमापनासाठी २५ वर्षाचा काळ योग्य असा कालखंड मानला जातो. आणि एवढ्याच काळात अमुलाग्र बदल घडेल असं सुद्धा नाही. ह्या सगळ्या प्रवासात आपण निश्चितपणे महिला सक्षमीकरणाचे सूत्र हे २५ वर्षाच्या काळात पाहावयास मिळतो. महिला आरक्षणाच्या संदर्भात आजपर्यंत झालेले संशोधन किंवा अभ्यास यामध्ये महिलांना मिळालेले आरक्षण हे केवळ निवडणुका पर्यंत मर्यादित आहे. पुरूषांचाच प्रत्यक्ष कारभार असतो असे निष्कर्ष मांडलेले आहेत. असे असले तरी या आरक्षणाचा फायदा निश्चितपणे असा सांगता येईल की महिला संख्येने कमी जरी असल्यातरी ह्या आरक्षणामुळे अनेक महिला स्वकर्तृत्वावर कोणत्याही राजकीय पार्श्वभूमीवर शिवाय पूढे येत आहेत. राजकीय प्रक्रियेत सहभागी होत आहेत. आणि महिला आरक्षणाचे जे हेतू आहेत त्यासाठी स्वकर्तृत्वावर पुढे आलेले महिला नेतृत्व पुढील वाटचालीसाठी दिशादर्शक ठरणारे आहे. त्यामुळे हे नेतृत्त्व कशापद्धतीने उभे राहते ? ह्या नेतृत्त्वाची नेमकी कार्यपद्धती काय ? या नेतृत्वाला येणाऱ्या अडचणी कोणत्या ? ह्यांचा अभ्यास केला तर हा अभ्यास पुढील महिला नेतृत्त्वासाठी एक मार्गदर्शक अभ्यास ठरू शकतो जे महिला सबलीकरण, महिलाधोरणासाठी व त्यांचा राजकीय सहभाग वाढण्यासाठी म्हणून या नेतृत्त्वाचा अभ्यास मार्गदर्शक ठरू शकतो. येणाऱ्या महिला नेतृत्त्वाने कशा पद्धतीने काम केले पाहीजे यासाठी हा अभ्यास दिशादर्शक ठरेल आणि खऱ्या अर्थाने लोकशाही अधिक सदृढ बनेल.

स्थानिक शासन संस्थेतील महिला नेतृत्त्वाचा अभ्यास : विशेष संदर्भ हिंगोली जिल्हा (इ.स.१९९९ ते २०२०)

प्रकरण : १ ले - **प्रस्तावना**

प्रकरण : २ रे - **भारतातील स्थानिक शासन संस्थाचा इतिहास व विकास**

प्रकरण : ३ रे - **हिंगोली जिल्ह्यातील महिला नेतृत्त्व**

प्रकरण : ४ रे - **हिंगोली जिल्ह्यातील स्थानिक शासन संस्थातील महिला नेतृत्त्वाचा अभ्यास**

प्रकरण : ५ वे - **सारांश व निष्कर्ष**

संशोधनाची उद्दिष्टे

- भारतीय लोकशाही अधिक परिपक्व होण्यासाठी राजकीय सहभाग तपासने.
- हिंगोली जिल्ह्यातील स्था.शा.संस्थेतील महिला नेतृत्त्वाचा अभ्यास करणे.
- राजकीय वारसा न लाभलेल्या महिला नेतृत्त्वाचा अभ्यास करणे.
- ७३ व्या व ७४ व्या घटनादुरूस्तीनंतर स्थानिक शा. संस्थेतत झालेला संरचनात्मक बदल अभ्यासने.
- हिंगोली जिल्ह्यातील स्था.शा. संस्थेतील महिला प्रतिनिधीची भूमिका अभ्यासने.

गृहितके :-

१. राजकीय पार्श्वभूमी असलेल्या महिलांना राजकारणात अधिक संधी असल्यातरी राजकीय पार्श्वभूमी नसलेल्या अनेक महिला नेतृत्त्वाने स्वकर्तृत्त्वाने आपली छाप पाडलेली आहे.

२. राजकीय, सामाजिक, आर्थिक संघटनांच्या कामकाजात सहभागाची पार्श्वभूमी व अनुभव असलेल्या महिलांचा स्थानिक स्वराज्य संस्थातील सहभाग प्रभावी असतो.

३. राजकीय समज आपल्या अधिकाराची प्रचिती, सजगता व आत्मभान या बाबी तुलनात्मक दृष्टीकोनातुन सर्वसामान्य महिलापेक्षा राजकीय प्रक्रियेत सहभागी असलेल्या महिलांमध्ये अधिक प्रभावी असल्याचे दिसुन येते.

४. हिंगोली जिल्ह्यातील स्थानिक शासन संस्थेत मागासवर्गीय महिलांचा अधिक सक्रीय सहभाग दिसतो.

५. महिलांच्या सहभागामुळे लोकशाही व्यवस्थेला बळकटी प्राप्त झाली आहे.

६. ७३ व्या व ७४ व्या घटना दुरूस्तीने महिलांचा स्थानिक शासन संस्थेच्या कारभारात सहभाग वाढला.

७. स्त्रीयांनी सुद्धा स्वतंत्र नेतृत्व निर्माण केलेले आहे.

८. हिंगोली जिल्ह्यातील स्थानिक शासन संस्थेतील महिला नेतृत्वाचा कार्यकाळ समाप्तीनंतर राजकारणातील सहभाग कमी राहिला आहे.

संशोधन समस्या :-

''स्थानिक शासन संस्थेतील महिला नेतृत्त्वाचा अभ्यासः विशेष संदर्भ हिंगोली जिल्हा (इ.स.१९९९-२०२०)'' या विषयाला अनुसरून

पुढील समस्या सूत्रबद्ध करण्यात आल्या आहेत.

१) स्थानिक शासन संस्थामधील सत्तापदे सांभाळण्यासाठी महिला पूढे येत असल्यातरी त्यापैकी किती महिला स्वकर्तृत्वावर राजकीय क्षेत्रात यशस्वी झाल्या याचा शोध घेणे आवश्यक आहे.

२) स्थानिक शासन संस्थेच्या कामकाजात किती महिला सदस्य सतत सक्रिय राहतात.

३) ७३ व्या व ७४ व्या घटना दुरूस्तीचा कितपत फायदा लोकशाही विक्रेंद्रीकरणासाठी झालेला आहे.

४) आरक्षणातून महिलांना मिळालेल्या संधीचा उपयोग त्यांच्याकडून होतो का ?

५) पुरूष वर्गाचे महिलांना सहकार्य मिळते का ?

६) राजकीय पार्श्वभूमी नसलेल्या किती महिला नेतृत्त्वाचा राजकीय विकास झालेला आहे?

वरील सर्व समस्यांचा अभ्यास करता ह्या सर्व समस्या स्थानिक शासन संस्थेतील महिला नेतृत्वाच्या संदर्भाने दिसून येतात. या समस्यांचा शोध घेण्यासाठी संशोधकाने **स्थानिक शासन संस्थेतील महिला नेतृत्त्वाचा अभ्यासः विशेष संदर्भ हिंगोली जिल्हा (इ.स. १९९९ ते २०२०)** हा विषय अभ्यासासाठी निवडला आहे.

संशोधन विषयाची व्याप्ती :-

स्थानिक शासन संस्थेतील महिला नेतृत्त्वाचा अभ्यासः विशेष संदर्भ हिंगोली जिल्हा (इ.स.१९९९ ते २०२०) हा संशोधनाचा विषय आहे. हिंगोली जिल्हा हा नव्याने आस्तित्वात आलेला जिल्हा असून विदर्भाच्या सिमेवर आहे. हिंगोली जिल्ह्यातील जिल्हा परिषद, नगरपालिका व पंचायत समिती, या स्थानिक शासन संस्थेतील महिला नेतृत्व हा अभ्यासाचा केंद्रबिंदू आहे. त्यामुळे महिलांसाठी आरक्षित, गट, प्रभाग व गण या मधून निवडून आलेल्या महिला नेतृत्त्वाचा नमुना पद्धतीने अभ्यास केला जाणार आहे.

संशोधन पद्धती :-

स्थानिक शासन संस्थेतील महिला नेतृत्व : विशेष संदर्भ हिंगोली जिल्हा (इ.स.१९९९ ते २०२०) हा संशोधनाचा विषय आहे. प्रस्तूत विषयाचे संशोधन करतांना संशोधनाच्या एकुण चार पद्धतीपैकी वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात येणार

आहे. तसेच सामाजिक शास्त्रातील सर्वेक्षण पद्धतीचा अवलंब केला जाणार आहे. या स्त्रोताच्या साह्याने संकलित केलेल्या तथ्याचे विश्लेषण करण्यात येणार आहे.

तथ्य संकलन :-

संशोधन विषयाशी संबंधित घटनाचे अध्ययन करून त्या घटनासंबधीत तथ्यांचे संकलन केले जाते आणि त्या तथ्याच्या आधारे संशोधन निष्कर्ष मांडले जातात. म्हणून तथ्याचे संकलन शास्त्रीय पद्धतीने करणे आवश्यक आहे. प्रस्तुत संशोधनासाठी दोन प्रकारे तथ्याचे संकलन करण्यात येणार आहे. प्रस्तावित संशोधनासाठी प्राथमिक व दुय्यम स्त्रोतांचा उपयोग होणार आहे. आणि या स्त्रोतांच्या साह्याने संकलित केलेल्या तथ्याचे विश्लेषण करण्यात येणार आहे.

१) प्राथमिक स्त्रोत :-

प्रस्तुत संशोधनामध्ये संशोधकाने प्राथमिक तथ्याच्या संकलनासाठी मूलाखत, प्रश्नावली, अनुसूची व निरीक्षण या तंत्राचा अवलंब करण्यात येणार आहे.

२) दुय्यम स्त्रोत :-

प्रस्तुत संशोधनामध्ये संशोधकाने दुय्यम तथ्य संकलनासाठी विविध ग्रंथालयात असणारे संदर्भ ग्रंथ, ज्ञानकोश, विश्वकोष शासकीय अहवाल, दैनंदिनी, वृत्तपत्र, मासिके, त्रैमासिके, वार्षिक अहवाल यांचाही वापर केला जाणार आहे. तसेच इंटरनेटचाही उपयोग करण्यात येणार आहे.

प्रकरणाची रुपरेषा :-

प्रस्तुत संशोधनात तथ्यांचे विश्लेषण करून त्यांच्या वर्गीकरणासाठी संशोधन आरखडा तयार केला आहे. संशोधन उद्दिष्टाच्या आधारे एकुन पाच प्रकरणाच्या आधारे शोध प्रबंधाची मांडणी् करण्यात येणार आहे.

प्रकरण पहिले :- प्रस्तावना :

सदर प्रकरणामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थेची निर्मिती हिंगोली जिल्हा हिंगोली जिल्ह्याची निर्मिती, येथील राजकारण व महिला, तसेच राज्य पातळीवर आणि राष्ट्रीय पातळीवर जिल्ह्यातून निर्माण झालेले महिला नेतृत्त्व यांचा अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण दुसरे :- भारतातील स्थानिक स्वराज्य संस्थांचा इतिहास व विकास

सदर प्रकरणामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थाचा इतिहास व विकास इतिहास व विकास, स्थानिक स्वराज्य संस्थेच्या अर्थ, महाराष्ट्रातील पंचायत राज व्यवस्था, स्थानिक स्वराज्य संस्थाची आकडेवारी विशद करण्यात येणार आहे. त्याच बरोबर हिंगोली जिल्ह्यातील, जिल्हा परिषद, पंचायत समिती व नगरपालिका या संस्थेतील महिला प्रतिनिधीची संख्यात्मक माहिती विशद करण्यात येणार आहे.

प्रकरण तिसरे :- हिंगोली जिल्ह्यातील महिला नेतृत्त्व

प्रस्तुत प्रकरणामध्ये हिंगोली जिल्ह्यातुन निर्माण झालेल्या नेतृत्त्वाची माहिती विशद करण्यात येणार आहे. व ७३ आणि ७४ व्या घटनादुरुस्तीनंतर त्याच झालेल्या बदलाची माहिती विशद करण्यात येणार आहे. हिंगोली जिल्ह्यातील स्वतंत्रपणे निर्माण झालेले महिला नेतृत्त्व यांची माहिती व विकासात्मक कामे यांचा आढावा घेण्यात येणार आहे.

प्रकरण चौथे :- हिंगोली जिल्ह्यातील स्थानिक शासन संस्थातील महिला नेतृत्त्वाचा अभ्यास

सदर प्रकरणामध्ये हिंगोली जिल्ह्यातील जिल्हा परिषद, पंचायत समिती व नगरपालिका या स्थानिक शासन संस्थेतील राजकीय वारसा न लाभलेल्या व राजकीय वारसा असलेल्या महिला नेतृत्त्वाची माहिती विषद करण्यात येणार आहे. तसेच ज्यांना राजकीय वारसा नसतांना सुद्धा त्यांनी निर्माण केलेले नेतृत्त्व यासाठी त्यांच्या मुलाखती व त्यांच्या विकासात्मक कामाचा आढावा घेण्यात येणार आहे. तसेच त्यांना येणाऱ्या अडचणी याबद्दलची माहिती विषद केली जाणार आहे.

प्रकरण पाचवे : सारांश व निष्कर्ष

सदर प्रकरणात संशोधनातून निघालेले निष्कर्ष व शिफारशी मांडल्या जाणार आहेत.

संदर्भ सूची :

१. डॉ.शाम शिरसाठ : भारतातील स्थानिक स्वराज्य संस्था, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद.

२. डॉ.कांतराव पोले : महाराष्ट्रातील पंचायतराज व महिला आरक्षण, आरुणा प्रकाशन लातूर.

३. डॉ.सतिश ठोंबरे : भारतातील स्थानिक स्वशासन, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद.

४. उमाकांत वानखेडे : भारतातील संविधानातील सामाजिक न्यायाची संकल्पना नितीनिर्देशक तत्त्वाचा विशेष अभ्यास.

५. सुरेश काकडे : पंचायतराज, प्राची प्रकाशन.

६. प्रा.संजय खंदारे पंचायत राज संस्था आणि विकासाच्या योजना, अंजू प्रकाशन, औरंगाबाद.

७. डॉ.अजय पाटील : पंचायत राज आणि महिला नेतृत्त्व, मैत्री प्रकाशन, लातुर.

संशोधक

निरंजन केशवराव पतंगे

मार्गदर्शक

डॉ. पाटील व्ही.आय.

(राज्यशास्त्र विभाग प्रमुख)

(संभाजीराव केंद्रे महाविद्यालय जळकोट,

ता.जळकोट जि. लातुर)